**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास वादीतर्फे वकिल श्री. आर.डी.आंबिये यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

३१.  रमाकांत मसुरकर यांना मी ओळखतो. दाव्याची मिळकत ही माझया माहितीची आहे. दावा मिळकतीचे रमाकांत मसुरकर मालक आहेत हे मला मान्य आहे. माझया म्हणण्याप्रमाणे सदरील दावा मिळकत ही माझेकडे भाडेसाठी आहे. त्याचे भाडे वार्षिक सुरुवातीला रु.३६/— होते नंतर रु.४०/— होते. माझया म्हणण्याप्रमाणे सन २००२ ला वार्षिक भाडे रु.४०/— होते. सन २००३ ला माझे वडील सतीश काशिनाथ दुभाषी होते. कमलाबाई ही माझी आजी आहे. माझे म्हणण्याप्रमाणे माझे वडील, आजी यांचेकडे भाडेकरुपणा होता. रमाकांत मसुरकर यांनी सन २००३ मध्ये माझया वडिलांना नोटीस पाठविली याबाबत मला माहिती आहे. रमाकांत मसुरकर यांनी भाडेकरुपणा रद्द होणेसाठी जी नोटीस पाठविली होती त्याला त्यांनी उत्तर दिले होते का हे मला माहित नाही कारण सर्व काम माझे वडील पहायचे. काशिनाथ रावजी दुभाषी हे माझे आजोबा. त्यांनी जमीन भाडेकरुपणा घेणेसाठी कबुलायत करुन ती स्विकारली होती का याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, भाडेकरुपणा स्विकारताना किती वर्षासाठी स्विकारले अशा स्वरुपाचा कागद मी पाहिला नाही. ज्या सालात पहिल्यांदा भाडेकरुपणा स्विकारला ते साल १९५७ असून त्या सालचा कागद मी पाहिला आहे पण तारीख आठवत नाही.

३२.  भाडेकरुपणा हा सॉ मिल, पिठाची गिरणी व भाताचा हॉर्लर या व्यवसायासाठी सुरु झाला असे माझया ऐकण्यात आहे. जॉन लुईस नुगेरा हे मुळ जमिनीत भाडेकरु होते हे मला माहित आहे. मसुरकराचे अगोदर नाडकर्णी हे जमीन मालक होते हे मला माहित आहे. नुगेरा व मसुरकर यांचेमध्ये भाडेकरार दिनांक ०२/०२/१९५६ मध्ये झाला होता याबाबत मला माहिती नाही. नुगेरा यांचेकडून माझया आजोबांनी घर विकत घेतले. नुगेरा यांचा भाडेकरुपणा आम्ही पुढे चालू ठेवला असे माझे म्हणणे आहे. नुगेरा यांच्या भाडेकरुपणाच्या काय अटी व शर्ती होत्या त्या मला आठवत नाही. पिठाची गिरणी ही चालू असल्याचे मी पाहिले आहे. हॉर्लर बंद अवस्थेत होता. सॉ मिल चालू होती. माझया म्हणण्याप्रमाणे दुभाषी यांची एक सॉ मिल आहे. त्याचे नाव दुभाषी सॉ मिल असे आहे. रमाकांत मसुरकर यांनी स्वत:च्या सहीने आमच्याकडून भाडे स्विकारलेली भाडयाची पावती आहे का हे मला सांगता येणार नाही.

१९५६ सालापासून दावा मिळकतीचे भाडयाची रक्कम कोणाकोणाला दिली त्यांची नावे मला आता आठवत नाहीत. १९८० ते २००२ पर्यंत भाडे पोहोच केले याची पावती माझेकडे आहे. त्यानंतरच्या पावत्या माझेकडे नाहीत. २००२ सालपासून ते २०१८ पर्यतचे भाडे न्यायालयात जमा करावे अशी इच्छा माझी झालेली नाही. साक्षीदाराने सांगितले की, माझे वडील सर्व पहात होते.

**वादीतर्फे वकील यांचा नि.११८ अन्वये पुढील उलटतपासासाठी मुदतीचा अर्ज आल्याने व तो मंजूर झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/—

दिनांकः—१९/१०/२०१८

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.